**<u>न्यायदंडाधिकारी वर्ग १ देवरुख यांचे न्यायालयात, मुक्काम देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी</u>.**

नि.फौ.खटला क्र. ६१/२०२४

नि.क्र. ११

**<u>दोषारोपपत्र</u>**

**<u>मी, श्रीमती आर. आर. कुलकर्णी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख, याद्वारे तुमच्यावर आरोप निश्चित करीत आहे की</u>,**

**आरोपीचे नाव –** **अविनाश सुरेश गुरव,**
**वय** – ३२ वर्षे, **व्यवसाय** – शेती,
**राहणार –** बोंडये, भेरेवाडी,
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**यांचेवर खालील प्रमाणे दोषारोप ठेवणेत येतो की,**

तुम्ही आरोपीने दिनांक १४/०६/२०२४ रोजी ००:३० वाजता बोंडये, भेरेवाडी, बौद्धवाडी, ता. संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी येथे, यशवंत सोमा गुडेकर यांचे अंगण व लगतचे समोरील मळीत फिर्यादी नामे – आदित्य बळीराम भेरे यांचा भाऊ गणेश बळीराम भेरे यांचे उजव्या कानावर कुदळीच्या पाठीमागील बाजुकडून मारुन त्याला व भाऊ गणेश याला वाचविण्यासाठी फिर्यादी गेले असता कुदळीचे समोरील धारेकडील बाजुने फिर्यादीच्या डावे कानावर मारुन त्या दोघांना इच्छापूर्वक दुखापत केली, त्याद्वारे, तुम्ही ***<u>भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४ अन्वये</u>***, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

दुसरे असे की, उपरोक्त वेळी, तारखेस व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादी, त्याचे भाऊ विघ्नेश भेरे व गणेश भेरे यांना स्वेच्छेने दुखापत केली, त्याद्वारे तुम्ही ***<u>भारतीय दंड</u>***

***संहिता, १८६० चे कलम ३२३ अन्वये***, अन्वये, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

शेवटचे असे की, उपरोक्त वेळी, तारखेस व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळी करुन त्यांचा अपमान सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा इतर गुन्हा फिर्यादीकडून घडावा या हेतूने केला, त्याद्वारे, तुम्ही ***भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ५०४ अन्वये***, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

**सदर गुन्हा माझे कार्यक्षेत्रातील असून तुमच्याविरुध्द या न्यायालयात खटला चालविला जाईल.**

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.07.31 10:50:09 +0530

**स्थळ – देवरुख** **(रोहिणी आर. कुलकर्णी)**
**दिनांक – ३०/०७/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

**प्रमाणपत्र**

आरोपीला त्याच्या मातृभाषेत आरोप पत्रातील मजकूर त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.07.31 10:50:14 +0530

**स्थळ – देवरुख** **(रोहिणी आर. कुलकर्णी)**
**दिनांक – ३०/०७/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

- : C E R T I F I C A T E : -

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 30/07/2025 |
| Charge signed by PO. on | :- | 30/07/2025 |
| Charge uploaded on | :- | 31/07/2025 |